# माझे दैवत - माझी शाळा




बालपणीच्या रम्य आठवणी निघाल्या की मन भूतकाळात रमते व सहाजिकच आपल्या शाळेतील सवंगड्यांची व शिक्षकांची आठवण येऊन मन हळवे होते. इंडियन एज्युकेशन सोसायटी मुलींची शाळा नंबर २, दादर या शाळेची मी विद्यार्थिनी. शाळा म्हणजे संस्काराचे विद्यापीठ. आमच्या शाळेतील सर्व शिक्षकांनी आम्हाला चांगले नागरिक म्हणून घडवले. आमच्या मुख्याध्यापिका सौ. वाघबाई या अत्यंत कडक शिस्तीच्या पण तितक्याच प्रेमळ होत्या. आम्हाला त्यांचा नेहमी धाक वाटत असे. ठाकूर बाई, गंधे बाई, चितळे बाई, पाटणकर बाई व इतर सर्व शिक्षिका आपापले विषय इतक्या तन्मयतेने शिकवत असे की कुठल्याही विषयाची आम्हाला भीती वाटत नसे.



सरदेशपांडे बाई व सिंधु कुलकर्णी बाई

सिंधु कुलकर्णी बाई आम्हाला इयत्ता पाचवीला इंग्रजी विषय शिकवायच्या. त्यावेळी मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये इंग्रजी हा विषय पाचवी इयत्तेपासून शिकण्यास असे. इंग्रजी भाषेतील व्याकरण त्या अत्यंत सोप्या पद्धतीने समजावत. Between & among मधील फरक समजवताना दोन झाडे व त्यामधील एक मनुष्य याचे चित्र म्हणजे between व among  म्हणजे दोनापेक्षा अधिक झाडांची चित्रे व त्यामध्ये दाखवलेल्या माणसाचे फळ्यावर त्यांनी काढलेले चित्र अजून डोळ्यासमोर आहे. वर्गातील विद्यार्थ्यांचा समावेश करून प्रात्यक्षिक केल्याने व चित्रांच्या आधारे हसत खेळत समजावून सांगितल्याने इंग्रजी विषयाची गोडी आम्हाला लागली.
इंग्रजी विषयाच्या स्पर्धात्मक परीक्षांना बसण्यासाठी त्यांनी आम्हाला प्रोत्साहित केले व त्याचा आम्हाला दहावीला फायदा झाला.

तर्खडकरांची इंग्रजी भाषांतरं ह्या पुस्तकांचा संग्रह प्रत्येक विद्यार्थाकडे त्याकाळी असे. सरदेशपांडे बाईंनी दहावीला इंग्रजी विषयाचा घेतलेला सराव पुढील आयुष्यात कॉलेजमध्ये फार उपयोगी पडला. त्याकाळी विद्यार्थ्यांमध्ये मार्कांसाठी आजच्यासारखी चढाओढ नव्हती व शाळेतच सर्व विषयांची उजळणी अतिशय उत्तम रीतीने होत असे त्यमुळे क्लासेसला जाण्याचे प्रमाण अत्यंत अल्प होते. बागकाम, शिवणकाम, शारिरिक शिक्षण, कार्यानुभव, चित्रकला हे विषयही आम्ही आनंदाने शिकायचो. गणिताच्या तासाला म्हटलेले पाढे अजूनही स्मरणात आहेत. गणिताची वारंवार घेतलेल्या उजळणीमुळे गणिताची भीती कधी वाटलीच नाही. विज्ञान, इतिहास व भूगोलाशी गट्टी कधी जमली ते कळलेच नाही. शाळेची घंटा, मधली सुट्टी, मैत्रिणींबरोबर खाल्लेला डबा, मैदानी खेळ आणि शिक्षकांचे प्रेम व आपुलकी ह्या आठवणींचा सुगंध आपल्या आयुष्यात कायमचा दरवळत रहातो. माझ्या सर्व शिक्षकांचे उर्वरित आयुष्य निरोगी व आनंदी जावे ही ईश्वर चरणी प्रार्थना.

त्यांनी आमच्यावर केलेल्या उत्तम संस्काराचा वसा आता आम्ही आमच्या पुढच्या पिढीत म्हणजे आमच्या मुलांमध्ये चालू ठेवला आहे.

**दर्शना प्रभूतेंडोलकर**

('महाराष्ट्र टाईम्स'च्या सौजन्याने)